## ' अनैतिक मानवी वहातुक प्रतिबंध समन्वय कक्ष '

- **अनैतिक मानवी वहातुक प्रतिबंध समन्वय कक्ष स्थापना** - दिनांक ३१/०३/२००८ रोजी, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा.पुणे येथे.
- **राज्याचे समन्वय अधिकारी** - विशेष पोलीस महानिरीक्षक, म.अ.प्र.वि. गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा.पुणे
- **महाराष्ट्र राज्यात स्थापन करण्यात आलेले १२ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष खालील प्रमाणे**
- **सन २०१० - एकुण ४ -** - मुंबई शहर, पुणे शहर, ठाणे शहर, सांगली
- **सन २०११ - एकुण २ -** ठाणे ग्रामीण व नागपूर शहर
- **सन २०१२ - एकुण ६ -** नवी मुंबई, सोलापूर शहर, यवतमाळ, बीड, अहमदनगर, कोल्हापूर

**समन्वय कक्षाकडून होणाऱ्या कामकाजाची माहिती खालील प्रमाणे.**

➢ महाराष्ट्र राज्य गृह विभागाकडील अधिसुचनेद्वारे अनैतिक मानवी वहातुक प्रतिबंध अधिनियम १९५६ अंतर्गत पोलीस आयुक्त, अमरावती, औरंगाबाद, नाशिक, नागपूर, नवी मुंबई, पुणे, ठाणे व सोलापूर आयुक्तालय क्षेत्राकरीता **पोलीस आयुक्त यांची कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन तसेच अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच या कायद्यातील कलम १८ व २० या प्रयोजनासाठी त्यांना जिल्हाधिकारी यांचे अधिकारी प्रदान केले आहेत. आतापर्यंत ४६ कुंटनखाणे बंद करण्यात आले आहेत.**

➢ महाराष्ट्र राज्य गृह विभागाकडील अधिसुचनेद्वारे अनैतिक मानवी वहातुक प्रतिबंध अधिनियम १९५६ अंतर्गत **'विशेष पोलीस अधिकारी ' नामनिर्देशन** - पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, सहा.पोलीस आयुक्त/ पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व आयुक्तालयातील सामाजिक सुरक्षा विभागाचे पोलीस निरीक्षक आणि जिल्हा गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, तसेच त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी हे त्यांचे मदतनीस असतील.

➢ 'अनैतिक मानवी वहातुक प्रतिबंध' संदर्भात **पिडीत महिलेवर कोणत्याही प्रकारची कारवाई न करता आरोपींवर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शन, कायदयाची परिपूर्ण माहिती व गुन्हे शाबीतीचे प्रमाण वाढविणे** साठी विधी अधिकारी, अशासकीय संस्थाचे सदस्य, पोलीस अधिकारी यांच्या **१९ कार्यशाळा घेण्यात आल्या आहेत.**

➢ **'जनजागृतीसाठी प्रयत्न'** - 'One life No Price' या सीडीचे प्रमुख चित्रपट गृहात, कार्यशाळा, शाळा, महाविद्यालय इत्यादी ठिकाणी वेळोवेळी सर्व घटक प्रमुखांना प्रदर्शित करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

➢ गृह विभाग, महाराष्ट्र शासन परिपत्रकानुसार १४ वर्षाखालील हरविलेल्या बालकांच्या बाबतीत त्यांचे कायदेशीर पालकांकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतर अपहरणाचा गुन्हा दाखल करण्याबाबत सर्व पोलीस घटकांना परिपत्रकाद्धारे सुचित करण्यात आलेले आहे.

➢ **इंदिरा गांधी मुक्त विदयापीठ (IGNOU)** तर्फे अनैतिक मानवी वहातुक प्रतिबंध संदर्भात ऑनलाईन कोर्स पोलीस अधिकारी/कर्मचारी,अशासकीय संस्थांचे सदस्य व महिला व बाल विकास व इतर यांचे करीता सुरु करण्यात आला आहे. त्याबाबत जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थी यांनी प्रवेश घेण्याकरिता वेळोवेळी प्रोत्साहीत करण्यात येते.

➢ **'अनैतिक मानवी वहातुक प्रतिबंध कक्षाचे ' स्थापनेपासून माहे जुलै २०१३ पर्यंत केलेली कार्यवाही खालील प्रमाणे.**

- ५६६ वहातुकदारांचा डाटा संकलित करुन केंद्रीय गृह मंत्रालयास सादर करण्यात आलेला आहे.
- ३०४४ हरविलेल्या बालकांची माहिती संकलित करुन केंद्रीय अन्वेषण विभाग (CBI), नवी दिल्ली यांना सादर करण्यात आला आहे.
- ८३२ पिडीतांच्या सुटकेच्या धाडी (Rescue Operation) टाकून कार्यवाही करण्यात आलेली आहे.
- ४७२९ पिडीत महिला व मुलींची सुटका करण्यात आली.
- २७५९ अनैतिक मानवी वहातुक करणारे आरोपीनां (वहातुकदार) अटक करुन त्यांचेवर कार्यवाही करण्यात आली.